# अहमदनगर - वेध गीत २०१२

चिरा असे चिरंतन पायाशी भुईत
कळस कवेत घेई आकाशाचे गीत.

एक एक सद्‌गुणाची, पायरी बांधली
सातत्याच्या मुशीमध्ये, तावली तापली
घाव सोसले ते सारे, आपुले म्हणोनि
भिंती पेलल्या सहजी, हसुनि-खेळुनी ।।१।।

उंची वाढे कर्तृत्वाची, चारी दिशा सर
तृप्त नजरेने भुई, घालते पाखर
विकासाचा धूपगंध भरला राऊळी
नम्रतेच्या कोंदणात, यशाला झळाळी ।।२।।